# सत्ताधारी म्हणतात ऐतिहासिक अर्थसंकल्प, मात्र विरोधकांचा भ्रमनिरास!




## केंद्रीय अर्थसंकल्पावर जिल्ह्यातील विविध मान्यवरांच्या प्रतिक्रीया

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती - केंद्रीय अर्थमंत्री निर्मलाजी सीतारमण यांनी आज 1 फेब्रुवारी रोजी देशाचा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पाला सत्ताधाऱ्यांनी हा ऐतिहासिक अर्थसंकल्प संबोधला आहे, तर विरोधकांनी भ्रमनिरास करणारा अर्थसंकल्प असल्याचे म्हटले आहे.*

### अनूसूचित जाती, जमातीकरिता कुठलीही तरतूद नाही



हे बजेट जनसामान्य माणसांसाठी नसून नोकरदार व उद्योगपत्यांकरिता आहे, शेतकऱ्यांकडे साफ दुर्लक्ष केले आहे. बिहारच्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून हे बजेट बनविण्यात आले आहे. यामध्ये अनूसूचित जाती, जमातीकरिता कुठलीही तरतूद करण्यात आली नाही.

**बळवंत वानखडे, खासदार अमरावती.**

### देशात गुंतवणूक वाढेल



हे बजेट सर्व समावेश आहे. यामध्ये इन्कम टॅक्स मध्ये सवलत दिल्यामुळे ही देशात मोठ्या प्रमाणात गुंतवणूकदार आपली गुंतवणूक वाढवतील. या बजेटचे खऱ्या अर्थाने मी स्वागत करतो.

**चंदू यावलकर, आमदार मोर्शी विधानसभा मतदारसंघ.**

### केंद्रीय अर्थसंकल्पात शिक्षक कर्मचाऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली



अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात 4 ते 8 लाखांपर्यंत 5 टक्के कर, 8 ते 12 लाखांपर्यंत 10 टक्के आयकर कर, मग 12 लाखांचे उत्पन्न करमुक्त कसे? असा प्रश्न सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना पडलेला आहे त्याचबरोबर सर्व शिक्षा अभियान व इतर शैक्षणिक बाबतीत कोणतीही विशेष भरीव तरतूद न केल्यामुळे कर्मचारी शिक्षक ,पालक, संस्था चालक यांच्या तोंडाला पाने या अर्थसंकल्पात पुसलेली आहे.

**रुपेश टाले,अध्यक्ष**
**महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना खाजगी विभाग अमरावती.**

### देशाचा आर्थिक कणा अधिक मजबूत करणारा अर्थसंकल्प



या अर्थसंकल्पात बऱ्याच काही नवीन योजनांचा समावेश असल्याने हा अर्थ संकल्प देशाचा आर्थिक कणा अधिक मजबूत करणारा असून सर्व सामान्य नागरिकांसह शेतकरी, व्यापारी, लघु उद्योजक, मध्यमवर्गीय,नोकरदार व गुंतवणूकदार यांना मोठा दिलासा देणार अर्थसंकल्प आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी, सर्वसमावेशक विकास, लोकांच्या भावना आणि मध्यमवर्गीयांच्या आकांक्षांना न्याय देण्याच्यादृष्टीने यंदाचा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडला असून देशाचा आर्थिक कणा अधिक मजबूत होणार आहे.

**सुलभा खोडके, आमदार, अमरावती विधानसभा मतदारसंघ.**

### सामान्य लोकांना निराश करणारा अर्थसंकल्प



या अर्थसंकल्पात सरकारने फक्त बिहारवर जास्त लक्ष केंद्रित केलेले आहे. कारण बिहारमध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहे. त्यामुळे बिहार साठी भरपूर निधीची तरतूद केलेली आहे.याचा अर्थ राजकीय फायदा डोळ्यासमोर ठेवूनच सरकारने हे बजेट सादर केलेले आहे.महाराष्ट्रासाठी या बजेटमध्ये फार काही मिळालेले नाही. महाराष्ट्र बजेटमध्ये दुर्लक्षितच राहिलेला आहे. गरिबांना रोजगार देणाऱ्या मनरेगा योजनेच्या निधीत कपात केलेली आहे. यावरून सरकारला गरिबाशी काही घेणेदेणे नाही असे दिसून येते. शिक्षण व आरोग्य या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात कोणतीही भरीव तरतूद नाही. फक्त मोठमोठे आकडे देऊन लोकांना खोटे स्वप्न दाखवले आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प मुठभर लोकांच्या हिताचा आहे व गरिबांना निराश करणारा आहे.

**गजानन लवटे, आमदार, दर्यापूर विधानसभा मतदारसंघ.**

### शेतकरी, बेरोजगार व महिला,विद्यार्थ्यांना अर्थसंकल्प समर्पित



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचा सादर केलेला 2025 चा केंद्रीय अर्थसंकल्प गरीब, तरुण, अन्नदाता शेतकरी आणि महिलांच्या हिताचा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत मोदी सरकारने क्रेडिट कार्डची मर्यादा 5 लाख रुपये केली आहे. हा अर्थसंकल्प मध्यमवर्गीयांच्या आर्थीक उन्नतीसाठी व प्रत्येक क्षेत्राला विकासाची गती देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी जागा वाढीची घोषणा केली निश्चीत हा अर्थ संकल्प योग्य अभ्यास करून सादर केला गेला आहे.

**केवलराम काळे, आमदार, मेळघाट विधानसभा मतदारसंघ**

### 2047 मधील विकसित भारताचे अर्थसंकल्पात प्रतिबिंब



सर्वे सुखिना संतु चा संदेश देणाऱ्या 2025 च्या अर्थसंकल्पात 2047 मधील विकसित भारताचे प्रतिबिंब पाहायला मिळत आहे. या माध्यमातून सर्व समाज घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रभावीपणे प्रयत्न केल्याचे दिसत असल्याने भारत आता थांबणार नाही, विकासाची अशीच अजिंक्य घोडदौड प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू राहणार असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्राचे माजी कृषी मंत्री तथा भाजपचे राज्यसभा सदस्य डॉ.अनिल बोंडे यांनी दिली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आज भारताचा 2025 मधला अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाचे डॉ.बोंडे यांनी स्वागत केलं. बहुसंख्या असलेल्या मध्यमवर्गीयांना अपेक्षित असलेला मोठा दिलासा अर्थसंकल्पात मिळाला आहे.

**डॉ.अनिल बोंडे,**
**खासदार, राज्यसभा.**

### मध्यमवर्गीयांना समर्पित अर्थसंकल्प



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचा हा अर्थसंकल्प गरीब, तरुण, अन्नदाता शेतकरी आणि महिलांच्या हिताचा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत मोदी सरकारने क्रेडिट कार्डची मर्यादा 5 लाख रुपये केली आहे. मध्यमवर्गीयांना समर्पित असलेल्या या अर्थसंकल्पात 12 लाख रुपये उत्पन्न होईपर्यंत कोणताही आयकर भरावा लागणार नाही. तर पगारदारांना 12.75 लाख रुपयांपर्यंत करातून सूट देण्यात आली आहे.

**राजेश वानखडे, आमदार तिवसा विधानसभा मतदारसंघ.**

### महाराष्ट्र राज्याला या अर्थसंकल्पात फक्त भोपळा!



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी मांडलेला अर्थसंकल्प म्हणजे मुळातच आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार अशा पद्धतीचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे कुठलंही ठोस आर्थिक धोरण नसल्यामुळे निर्मला सीतारमन यांचा अर्थसंकल्प ही तसाच भरकटलेला आहे. मध्यमवर्गाला आयकरात सूट देण्याचा निर्णय फसवा असून महागाई कमी करण्यासाठी किंवा जीएसटी च्या माध्यमातून सुरू असलेला कर-दहशतवाद संपवण्यासाठी कुठलंही पाऊल यात उचललेलं नाही. लोकांच्या हातात पैसा खेळता राहील असा खोटा आशावाद दाखवण्यात आला आहे, मुळात हा पैसा जीएसटीच्या माध्यमातून काढून घेण्यात येणार आहे. आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांमध्ये जास्त लक्ष देणं आवश्यक होतं, परंतु या बजेटमध्ये त्यांना पुरेसं महत्त्व दिलं गेलेलं नाही. गरीब आणि मध्यमवर्गाच्या भल्यासाठी कुठल्याही योजना या अर्थसंकल्पात नाहीत. मनरेगा बाबत ही ठोस उपाययोजना नाहीत. महाराष्ट्राला चालू योजनांमध्ये जुजबी निधी देऊन मोदी सरकारने महाराष्ट्राची बोळवण केली आहे. देशाचं ग्रोथ इंजिन असलेल्या या राज्याचं संपूर्ण अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांना नाव घ्यावं वाटू नये ही शोकांतिकाच आहे.

**यशोमती ठाकूर, माजी मंत्री महाराष्ट्र राज्य.**

### गरीब व सर्वसामान्य जनतेला दिलासा नाही!



2025 अर्थसंकल्पामध्ये गोर - गरीब व सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळेल असे काहीच दिसून येत नाही.शिक्षण क्षेत्राकरिता अत्यंत कमी प्रमाणात तरतूद करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाकरिता चांगला भाव मिळेल असा कुठेही उल्लेख दिसून आलेला नाही. तसेच मनरेगा सारख्या जनकल्याण योजनेला कात्री लावण्याचे काम यामध्ये करण्यात आलेले आहे. देशातील शिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळेल याचा देखील उल्लेख यामध्ये नाही. अगोदर 100 स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवून सत्तेत येण्याचे कार्य यांनी केले त्याचप्रमाणे अर्थसंकल्प 2025 मध्ये गोर - गरीब व सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करणारे हे बजेट आहे.

**बबलु शेखावत, अध्यक्ष अमरावती शहर काँग्रेस कमिटी.**

### 2025 चा अर्थसंकल्प विकसित भारताचा दृढ संकल्प!



देशाचे लोकप्रिय आणि कर्तृत्ववान पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजींनी पाहिलेलं विकसित भारताचं स्वप्न आता प्रत्यक्षात येत आहे. नोकरदार, शेतकरी, महिला आणि मध्यमवर्गीयांसाठी अभूतपूर्व दिलासा देणारा 2025 चा केंद्रीय अर्थसंकल्प आज अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांनी सादर केला. आज सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प हा मोदी सरकारच्या प्रत्येक क्षेत्रात विकसित आणि सर्वोत्तम भारत निर्माण करण्याच्या दृष्टिकोनाचा आराखडा आहे. सबका साथ सबका विश्वास या सूत्रानुसार देशाच्या सर्वांगीण प्रगतीला चालना देणारे असे हे बजेट आहे.

**चेतन गावंडे**
**माजी महापौर, अमरावती.**

### योजनांचा पाऊस.. मात्र मागील अंमलबजावणी नाममात्रचं



बजेटमध्ये युवकांसाठी नोकरीमध्ये मोठी कोणतीही संधी नाही. महिला सक्षमीकरणासाठी ठोस उपाय योजना नाहीत. सोलर पावर जनरेशन सिस्टीम केवळ 4.2 टक्के. अंमलबजावणी मात्र कार्पोरेटमधील अदाणी यांच्या सारख्यांना प्रोत्साहन. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत मिळणार्यो रकमेत वाढ आवश्यक होती. बांधकाम साहित्यांच्या दरात वाढ पाहता वरील तरतुदीची आवश्यकता होतील. बजटमध्ये जनसामान्यांच्या आरोग्यासाठी मोठी घोषणा नाहीच. सामान्यांच्या आरोग्यावरील खर्च निश्चितच वाढणार. शेतकर्योंच्या शेती मालाला हमीभावाची कोणतीच घोषणा नाही. बिहारसाठी मखाणा मंडळाची स्थापना केंद्रीय अर्थमंत्र्यांचे मधुबनी पेटींग साडी नेसून बहुधा बिहार, झारखंडचे प्रमोशन असावे. महाराष्ट्रासाठी कोणतीही ठोस घोषणा नसल्याकारणाने दावोस मधील 61 करार, लाखो कोटींची गुंतवणूक यावर प्रश्न चिन्ह आहे. एकंदरीत बजेट म्हणजे योजनांचा पाऊस म्हणजेच पाऊसचं.

**सागर देशमुख,**
**युवासेना विभागीय सचिव पश्चिम विदर्भ.**

## चांदुर जहाणपूर येथे येवढ्याची पुनरावृत्ती टळली

### शेजार धर्माला काळिमा; 4 वर्षीय बालिकेवर अत्याचाराचा प्रयत्न, नराधमास अटक

**दर्यापूर** - तालुक्यातील चांदुर जहाणपूर येथे येवढ्याची पुनरावृत्ती टळली. गावात राहणाऱ्या ओमप्रकाश दुदंडे (वय 45 ) आरोपीने 4 वर्षांच्या चिमुकलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. या मूली बाजूच्या घरात खेळत होत्या. आरोपी तेथे गेला असता त्या लहान मुलीला पकडून ठेवले. तेव्हा दुसरी



मुलगी घरातून धावत जाऊन आरडाओरडा करत, आईला बोलावून आणले. सदर मुलगी आरोपीच्या गळ्यात दिसून आली व तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करताना आढळून आला. आरोपीला पकडून दर्यापूर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. संबंधित आरोपीवर पोस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

## दरोड्याच्या प्रयत्नात असणारे तिघे जेरबंद

### राजापेठ पोलिसांची कारवाई

**अमरावती** - दरोडा टाकण्याच्या उद्देशाने एकत्रित जमलेल्या तिघांना राजापेठ पोलिसांनी एमआयडीसी रोडवरील गाणुवाडी परिसरातील वेदश्री अपार्टमेंटजवळून अटक केली. गोपाल मधुकर थोरात (38, रा. चवरेनगर), अक्षय संजय गवई (27, रा. जयसियारामनगर) व विजय संजय सुर्यवंशी (28, रा. विलासनगर) व अधिक दोन इसम यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. त्यांच्या ताब्यातून मिरची पावडर, दुचाकी वाहन चायना चाकू, नॉयलॉन दोरी असे दरोडा टाकण्याचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

राजापेठचे पोलिस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे यांच्यासह पोलिस पथक 1 फेब्रुवारी रोजी पहाटेच्या वेळेत पेट्रोलिंग करीत असताना, त्यांना गाणुवाडी परिसरातील अंधारात पाच इसम हे संशयितरित्या आढळून आले. पोलिसांनी त्यांना सापळा रचून ताब्यात घेतले असता, त्यांच्याजवळ दरोडा टाकण्याचे साहित्य आढळून आले. पोलिसांनी ते साहित्य जप्त करून दोन्ही आरोपींना अटक केली. त्यांच्याविरुरध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

## जय अंबे ऑटो पार्ट दुकानाला आग



### लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.1 )** - रामपुरी कॅम्प स्थित कृष्णा नगर परिसरातील नवीन कॉटन मार्केटच्या अगदी समोर असलेल्या जय अंबे ऑटो पार्टच्या दुकानात शुक्रवारी रात्री 11 वाजताच्या सुमारास भिषण आग लागली. या आगीत लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले. या दुकानाचे मालक लखनलाल साहू असल्याची माहिति सूत्रांनी दिली आहे. आग लागण्याचे कारण समजले नसून आग कशाने लागली याबाबत चौकशी सुरु आहे.

जय अंबे ऑटो पार्ट नामक दुकानात वाहनांचे साहित्य विक्री केले जाते. शुक्रवारी रात्री जय अंबे ऑटो पार्टला अचानक आग लागली. त्यामुळे या घटनेची माहिती अग्निशमनला देण्यात आली. काही क्षणातच अग्निशमनच्या सात ते आठ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. अग्निशमनच्या जवानांनी आगीवर पाण्याचा सुरु केला. या आगीत जय अंबे ऑटो पार्ट दुकानाचे लाखो रुपयाचा नुकसान झाल्याची माहिती संचालक लखनलाल साहू यांनी दिली. यावेळी वेदांत काळोदे यांनीही आग विझविण्याचे प्रयत्न केले. याच दुकानाला लागून डॉ.ककरानीया यांचे हॉस्पिटल सुध्दा आहे. त्यामुळे आग वाढली असती, तर हॉस्पीटलचेही नुकसान होण्याची भिती होती. परंतू फायर ब्रिगेडच्या सहा ते सात गाड्याद्वारे आग विझवण्यात यश मिळाले. यावेळी घटनास्थळीवर डीसीपी गणेश शिंदे यांच्यासह कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके, पोलिसांचा ताफा, तसेच क्यूआरटी पथक व गाडगे नगरचे ठाणेदार पोलीस कर्मचाऱ्यासह घटनास्थळावर दाखल झाले झाले. आग लागण्याचे कारण समजले नसून याचा तपास गाडगे नगर पोलीस करत आहे. अकरा ते साडेअकरा वाजता दरम्यान ही आग आटोक्यात आली. परंतू या आगीत लाखो रुपयांच्या साहित्याचे नुकसान झाले आहे. या दुकानातील टायर, बॅटऱ्या, स्पेअर पार्ट, ऑइल साहित्य जळून खाक झाले. बारा वाजेनंतर ही घटनास्थळ वर आग विझवण्याचा काम सुरू होते. या दुकानाला लागून बरेच परिवाराची घरे आहेत. तर मागच्या बाजुला श्रीकृष्ण नगर या परिसरात लोकांचे वास्तव्य आहे. त्यामुळे आजूबाजूच्या नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

## विज्ञान प्रदर्शनीतील बक्षिसाची रक्कम वाढविणार!

### राज्यमंत्री पंकज भोयर ■ राज्यस्तरीय बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनीचा समारोप

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 )**- बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनीच्या माध्यमातून संशोधन आणि प्रगतशीलता दिसून येते. या बालवैज्ञानिकांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रदर्शनीमधील सर्वोत्कृष्ट उपक्रमांना देण्यात येणारी रक्कम वाढविण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली.

शिवाजी शिक्षण संस्थेच्या प्रांगणात आयोजित राज्यस्तरीय बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनीचा समारोप आज करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मिलिंद कुबडे, राज्य विज्ञान परिषदेच्या संचालक डॉ. हर्षलता बुरांडे, राज्य विज्ञान संस्थेचे प्रा. प्रवीण राठोड, शिक्षण उपसंचालक निलिमा टाके, शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, जयश्री




राऊत, संस्थेचे उपाध्यक्ष जयंत पाटील पुसदेकर, दिलीप इंगोले, प्राचार्य डॉ. गजानन कोरपे आदी उपस्थित होते.

राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, विद्यार्थ्यांना संशोधनाकडे वळवण्यासाठी विज्ञान प्रदर्शनी हे महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. या ठिकाणावरून असंख्य वैज्ञानिक दृष्टिकोन असलेली व्यक्तिमत्व घडली आहे. हे परिषदेचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे या प्रदर्शनीला विशेष महत्त्व आहे. राज्य वैज्ञानिक दृष्टिकोनासाठी अग्रस्थानी आहे. संशोधन आणि प्रगतिशीलतेतून नवे शोध समोर येतील. हे नवे शोध समस्या निराकरणासाठी उपयोगी पडतील. तसेच यातून महत्त्वाचे तंत्रज्ञान पुढे येईल. आपला देश तरुणांचा देश आहे. या प्रदर्शनीमधील नवीन संकल्पना बौद्धिकतेला चालना देतील. यातून विकसित असे उपक्रम राबविण्यात येतील. यासाठी समाजातील प्रत्येक वर्गाला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

भविष्यातील वैज्ञानिक घडविण्यासाठी संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी पंकज नागपुरे यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. कोरपे यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण राठोड यांनी अहवाल वाचन केले. सहभागी विद्यार्थ्यांमधून प्रसाद जाधव, युवराज कृष्णकुबेर आणि मनीषा गुप्ता यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सूनयंशी घोंगडे यांना चॅम्पीयन ट्रॉफी देवून गौरविण्यात आले. तसेच रेहान दारव्हणकर, जोसेफ, संस्कार देशमुख, पुष्पा वाकचौरे, पुनम कावर, गायत्री धुरी, संतोष देशमाने, गणेश बदकल यांनी प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल गौरविण्यात आले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

महासागर

अमरावती

रविवार, दि. 2 फेब्रुवारी 2025



# पोलीस कुटुंबीयांच्या समस्यांची दखल घेऊन मार्गी लावू!

## राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर / गृहराज्यमंत्र्यांचा पोलीस कुटुंबीयांशी संवाद



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.1 )–** पोलीस कुटुंबीयांशी संवाद कार्यक्रमात मांडण्यात आलेल्या समस्या लेखी स्वरुपात घेऊन त्या मार्गी लावण्यासाठी पूर्ण प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन गृह ग्रामीण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.

पोलीस मुख्यालयात शनिवारी (दि.1) डॉ. भोयर यांनी पोलीस कुटुंबीयांशी संवाद साधला. यावेळी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अतिरिक्त पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील, कल्पना बारवरकर आदी उपस्थित होते. राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी, पोलीस कुटुंबीयांच्या समस्या जाणून घेण्यासाठी हा संवाद कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. यामध्ये पोलिसांनी त्यांचे कुटुंबीय यांना होत असलेल्या समस्यांबाबत माहिती घेण्यात येत आहे. संवादामधून अनेक नवीन मुद्दे समोर येत आहेत. प्रामुख्याने पोलिसांच्या निवासस्थानाची समस्या समोर येत आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये शासनाच्या प्रयत्नाने मोठ्या प्रमाणात निवासस्थानी बांधण्यात येत आहेत. याबाबत राज्यस्तरावर समिती सहकार्य करीत आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी स्वातंर्त्यपूर्व काळातील पोलीस ठाणे आणि निवास व्यवस्था आहे. या ठिकाणी आवश्यक ती तरतूद करून समस्या मार्गी लागण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. पोलीस कुटुंबीय कायम दुसऱ्याच्या संरक्षणासाठी तयार असतात. मात्र पोलीस कर्तव्यावर असताना त्यांचे कुटुंब सुरक्षित राहील, यासाठीही प्रयत्न करण्यात येतील. आज संवादामध्ये मांडलेल्या विविध मुद्द्यांवर दखल घेण्यात येईल. या सर्व समस्या पोलीस प्रशासनाकडून लेखी स्वरुपात मागविण्यात येऊन त्या लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. पोलीस आयुक्त रेड्डी यांनी निवासस्थानाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी नवीन बांधकामे हाती घेण्यात आली आहे. तसेच पोलीस कुटुंबीयांशी सातत्याने संवाद साधण्यात येत असल्यामुळे अनेक समस्या निकाली निघत असल्याचे सांगितले. बारवरकर यांनी प्रास्ताविक केले. विशाल आनंद यांनी आभार मानले.

# दर्यापूर तालुक्यातील 3 पोलीस स्टेशन हद्दीत 461 प्रकरणे दाखल

## 311 गुन्ह्यांचा तपास, चोरीच्या घटनांमध्ये झाली वाढ




**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.1 )–** तालुक्यातील येवदा, खल्लार व दर्यापूर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वर्षं 2024 मध्ये विविध घटना घडल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक घटना दर्यापूर पोलीस ठाण्यांतर्गत घडल्याचे उपविभागीय पोलिस अधीकारी यांच्या अहवालानुसार समोर आले. तालुक्यात खुनाच्या पाच घटना घडल्या, तर खुनाचा प्रयत्न करण्यात आल्याची सहा प्रकरणे दाखल झाली आहेत. अपघातात 26 जणांचा मुत्यूं झाला, त्यापैकी 18 घटनानंमध्ये आरोपी वाहनचालकाची ओळखपरेड झाली आहे.

तालुक्यात जबरी चोरीची घटना 3 घडल्या आहे. घरफोडीच्या 21 घटनांची नोंद झाली असून, त्यापैकी 5 घटनातील आरोपी उघडकीस आले आहेत. चोरींच्या घटनांमध्ये मोठ्या संख्येने वाढ झाली असून, यामध्ये एकुण 92 गुन्हे दाखल झाले आहेत, त्यापैकी 44 घटना उघडकीस आल्या आहेत. दुखापतीसंदर्भात 168 घटना दाखल झाल्या व त्या सर्वांचे आरोपी निष्पन्न झाले आहेत. दर्यापूर, खल्लार व येवदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दंगासंदर्भात 11 प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल झाले. विश्वासघात प्रकरणात एक घटना दाखल झाली, तर फसवणुकीसंदर्भात 9 घटना दाखल आहेत. बलात्कार संदर्भात 12 घटना दाखल झाल्या असून, त्या सर्व घटना उघडकीस आल्या आहेत. विनयभंग केल्याच्या 25 घटनांची नोंद झाली आहे. दरम्यान 25 ही घटना उघडकीस आल्या आहेत. अशाप्रकारे वर्ष 2024 मध्ये येवदा, खल्लार व दर्यापूर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकूण विविध स्वरुपाच्या 461 घटना दाखल झाल्या आहेत. यातील 311 घटना उघडकीस आल्या आहेत. घडलेल्या विविध घटनांचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

### चोरी व चेन स्नॅचिंगच्या प्रकरणात मुद्देमालाची जप्ती नगण्य

वाढत्या चोरीच्या घटना तसेच फसवणूक संदर्भात दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी अनेक गुन्ह्याचा तपास पोलीस प्रशासन व संबंधित तपास अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून बाकीच आहे. त्यामुळे कित्येक महीने होऊनही त्रस्त तक्रारदार न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याचे चित्र आहे. तसेच चोरी व चेन स्नॅचिंगच्या गुन्ह्यातील तपास व मुद्देमाल परत मिळण्याचे प्रमाण नगण्य आहे.

# विद्यामंदिर शिक्षण संस्था सातेफळ येथे स्नेहसंमेलन

## सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.1 )–** तालुक्यातील विद्यामंदिर शिक्षण संस्था सातेफळ येथे वार्षिक स्नेहसंम्मेलन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन, हारार्पण व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन शासकिय कंत्राटदार जगदिश कथलकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष राजेश तिजारे यांनी भूषविले, तर प्रमुख अतिथी म्हणून घुईखेड केंद्राचे केंद्रप्रमुख राजेंद्र तांबसकर होते. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष संजय खंगार, संस्थेचे सदस्य श्रीकृष्ण सहारे, रेखा कदम, विजया रहांगडाले, पांडुरंग वेडे, शंकर बोटरे, सुरेंद्र दुधाट, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक तथा संस्थेचे सचिव नरेंद्र मानवटकर तसेच ग्रा.पं. सरपंच कविता खंगार ,उपसरपंच गजानन मानकर, ग्रा.पं सदस्य मीरा जाधव, अर्चना हुडमे, माजी पं.स.सदस्या प्रीती तिजारे, हायस्कुल विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका संगिता शेळके ह्या विचारपिठावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव नरेंद्र मानवटकर यांनी केले. संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात हायस्कूल विभागाच्या विद्यार्थीनींनी श्री गणेशा या गीतावर नृत्य सादर करून केली. शाळेतीत 1 ते 7 पर्यंतच्या एकुण 250 विदयार्थ्यांनी विविध गीत, शेतकरी नृत्य, गोंडी नृत्य, फ्युजन नृत्य, देशभक्तीपर नृत्य, धार्मिक नृत्य, तसेच शेतकरी आत्महत्या व बालविवाह यावर विद्यार्थ्यांनी नाटिका सादर केल्या. शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक तसेच शाळेला भेट वस्तू देण्याऱ्या मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे उद् ?घाटक जगदीश कथलकर व प्रमुख अतिथी राजेंद्र तांबसकर यांचा संस्थेच्यावतीने शाल, पुष्पगुच्छ व संविधानाची उद्देशिका देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन संतोष कडू व आभार प्रविण बेहरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्राथ. व माध्य.विभागातील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# श्रीनिवास पोकळे ला उत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार जाहीर





**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी,( दि.1 )** – वर्ष 2022 च्या 60 व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारासाठी अंतिम फेरीत 10 चित्रपटांनी नामांकने मिळवले आहे. यामध्ये उत्कृष्ट बालकलाकार म्हणून श्रीनिवास पोकळे ( छुमंतर) या चित्रपटातील उत्कृष्ट अभिनयासाठी पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

'छुमंतर' चित्रपटाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर या चित्रपटाला सरकारकडून चित्रीकरणासाठी परवानगी मिळाल्यानंतर अनेक सिनेमांच्या, मालिकांच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली. मराठी सिनेमांनी देखील अनेक ठिकाणी जाऊन योग्य ती काळजी घेऊन चित्रिकरण सुरु केले आणि विशेष करुन 'छुमंतर' या मराठी सिनेमाची चर्चा सर्वत्र जोरदार झाली. कारणही तसं विशेषच आहे. नितीन प्रकाश वैद्य निर्मित, समीर जोशी दिग्दर्शित 'छुमंतर' चे चित्रिकरण लंडनमध्ये करण्यात आले होते. सध्याच्या काळात परदेशात जाऊन शूटिंग करणे हे तसं चॅलेंजिंगच आहे, पण टीम वर्कमुळे शूटिंग यशस्वीरित्या पार पडले.

बालकलाकार श्रीनिवास पोकळे यांचा 'नाळ' या चित्रपटाला प्रेक्षकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला होता. या चित्रपटात 'चैत्या' म्हणजेच भूमिकेत आपल्याला श्रीनिवास पोकळे या बालकलाकाराला पाहायला मिळाला होता. नाळ हा चित्रपट 2018 मध्ये प्रदर्शित झाला. त्यावेळी श्रीनिवास केवळ आठ वर्षांचा होता. या चित्रपटातील त्याच्या कामाचे खूप कौतूक झाले होते. आता तो 'छुमंतर' या मराठी चित्रपटात दिसण्याची शक्यता आहे. मात्र शेवटपर्यंत त्याबद्दल कुठलीही अधिकृत घोषणा माहिती समोर आलेली नव्हती. चित्रपटात सध्या रिंकू राजगुरू, प्रार्थना बेहरे, सुव्रत जोशी आणि ऋशी सक्सेना लंडनमध्ये होते.

# न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये वर्ग 10 च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

## डॉ.शिवा पुंडकर यांचे अनमोल मार्गदर्शन



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.1 )–** येथील न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये वर्ग 10 वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ नुकताच पार पडला. यावेळी उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ.शिवा पुंडकर यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. पुंडकर म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात सर्वात मोठे आव्हान ते म्हणजे एक उत्कृष्ट विद्यार्थी घडविणे आहे. म्हणतात की, 'विद्या विनय शोभिते' नम्रपणा जर नसेल तर विद्येला कसलीच किंमत नसते आणि त्यासाठी खरी गरज असते ती योग्य मार्गदर्शनाची मोलाचे विचार विद्यार्थ्यांपुढे मांडले त्यामध्ये त्यांनी अभ्यासाची नियोजन पद्धती, बुद्धीच्या विकासासाठी ज्ञानाचे महत्त्व व त्यासाठी विविध उपक्रमाची नियोजन त्यासोबतच व्यवसाय निवडायचा असेल तर, तो कसा निवडावा याविषयीची उत्कृष्ट मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. सोबतच पालक व पाल्य यांच्या नात्यातील ऋणानुबंध कसे जपावे ? यांचे विविध उदाहरणाद्वारे आपले अमूल्य विचारांची सांगड व हितगुज विद्यार्थ्यांशी त्यांनी साधली. सोबतच या विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा ही दिल्या यशस्वी शिंगरवाडे, पूर्वा कऱ्हाने, यथार्थ बहुरूपी,कृष्णाली राठी, नेहा तोमर इत्यादी विद्यार्थ्यांनी या विशेष दिनाचे औचित्य साधून शाळेत घालवलेल्या संस्मरणीय आठवणींना उजाळा दिला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन येणाऱ्या परीक्षेकरिता शुभेच्छा देण्यात आल्या. या संपूर्ण कार्यक्रमाला शाळेचे संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, कोषाध्यक्ष डॉ. राजेंद्र राजोरीया, सदस्य विनय यावलकर शाळेच्या प्राचार्या माधुरी भोंडे, उपप्राचार्य प्रतीक शुक्ला, समन्वयक श्वेता गणोरकर इत्यादी मान्यवरांनी या विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन सोनाली खडक्कर यांनी केले. सदर कार्यक्रमाला शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# अखेर गटविकास अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने येणस वासियांचे उपोषण मागे

## डॉ.स्नेहल शेलार यांनी सोडविले उपोषण



**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर,( दि.1 )–** आपल्या विविध मागण्यांकरिता सुरु असलेले तालुक्यातील येणस वासियांचे बेमुदत उपोषण अखेर गटविकास अधिकारी डॉ.स्नेहल शेलार यांच्या मध्यस्तीने सोडविण्यात आले.

येणस ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता क्र. 273 ते गुणवंत बाबाराव कणसे यांच्या घरापर्यंत सार्वजनिक रस्त्यावर ग्रामपंचायतीकडून सिमेंट काँक्रीटचे बांधकाम करण्यात आले. मात्र या बांधकामाची कागदपत्रे ग्रामपंचायतीचे सरपंच व सचिवांनी गहाळ केली आहेत. त्यामुळे प्रमोद कणसे, मीना प्रमोद कणसे, नयन प्रमोद कणसे हे सार्वजनिक रस्त्यावर बेकायदा बांधकाम करत आहेत. न्यायालयातून न्याय मिळण्यात अर्जदारांना अडथळे येत आहेत. या अन्यायाविरोधात जयवंत कणसे, नरेश जुनघरे, पवन जुनघरे, सतीश जुनघरे, उमेश कणसे, सुमित कणसे, गणेश जुनघरे, राजेंद्र कणसे, रमेश जुनघरे यांनी 27 जानेवारीपासून कागदपत्रे मिळेपर्यंत आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला होता. उपोषणकर्त्यांनी दि.27 जानेवारी पासून उपोषण सुरू केले होते. त्या उपोषणकर्त्यांची भेट पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी डॉ.स्नेहल शेलार यांनी भेट देऊन उपोषण कर्त्यासोबत सर्व मागण्या संदर्भात मुद्देनिहाय चर्चा केली आणि सर्व मागण्या लवकरात लवकर सोडविण्याचे आश्वासन दिले आणि उपोषणकर्त्याना आपले उपोषण मागे घेणेबाबत विनंती केली. त्यावर सर्व उपोषणकर्त्यांनी आपली संमती दर्शवून उपोषण मागे घेतले यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी संजय झंझाड, विस्तार अधिकारी विठ्ठल जाधव, नितेश अंभोरे, श्रीकांत मघाडे उपस्थित आदी अधिकारी आणि येणस येथील गावकरी यावेळी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# महापुरुषांच्या विचारांचा राजकारण्यांकडून अजेंड्याप्रमाणे वापर- भाऊ तोरसेकर

## स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती जीवनगौरव पुरस्काराने केले सन्मानित ■ जिल्हा मराठी पत्रकार संघाचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.1 )** – महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर राज्याच्या वाटचालीचा विचार केला तर 1970 नंतर अचानक महाराष्ट्र फुले–शाहु–आंबेडकरांचा झाल्याचे आपल्या लक्षात येईल. पण आंबेडकर म्हणायचं, महापुरुषांचं नाव घ्यायचं, मात्र त्यांचे विचार अंगीकारणे तर दूरच आपण ते वाचले तरी आहे काय? समजून तरी घेतलेत काय? हे तपासण्याची गरज आहे. फुले–शाहु–आंबेडकर हा विचार आहे. पण आज दुर्दैवाने विचार बाजूला पडला आणि त्याचा अजेंडा झालेला आहे, जेवणात मीठ जसे चवीनुसार वापरले जाते तसे राजकारणात या महापुरुषांच्या विचारांचे झाले आहे. राजकारण्यांकडून फुले–शाहु–आंबेडकरांच्या विचारांसोबतच त्यांच्या नावाचाही केवळ स्वार्थासाठी वापर केला जात आहे. अशी खंत ज्येष्ठ पत्रकार आणि स्तंभलेखक व वक्ते भाऊ तोरसेकर यांनी व्यक्त केली.

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने आज भाऊ तोरसेकर यांचा स्व.दादासाहेब काळमेघ स्मृतीराज्यस्तरिय जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. हव्याप्र मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसदकर ऑडिटोरियममध्ये पार पडलेल्या या पूरस्कार वितरण सोहळ्यात सत्काराला उत्तर देताना भाऊ तोरसेकर बोलत होते. त्यांना स्व. दादासाहेब काळमेघ जीवन गौरव पूरस्काराने सन्मानित करण्यात आले. 41 हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह,शाल व पुष्पगुच्छ असे या पूरस्काराचे स्वरुप होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री बच्चू कडू आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ मंचावर उपस्थित होते. या समारंभात दै. लोकमतच्या नागपूर आवृत्तीचे संपादक श्रीमंत माने यांना स्व. जुगलकिशोर अग्रवाल स्मृती राज्यस्तरिय पत्रकारिता पूरस्कार प्रदान करण्यात आला. दै. भास्करच्या उपसंपादक गीता तिवारी यांना राहुल गडपाले यांनी पुरस्कृत केलेल्या विभागीय पत्रकारिता पूरस्काराने गौरवान्वित करण्यात आले. दै. सकाळचे जिल्हा प्रतिनिधी सुरेंद्र चापोरकर यांना दै. विदर्भ मतदार पुरस्कृत जिल्हास्तरिय (शहर) आणि धामणगाव रेल्वे येथील प्रतिनिधी मंगेश भुजबळ यांना दै. जनमाध्यम पुरस्कृत जिल्हास्तरिय (ग्रामीण) पत्रकारिता पूरस्कार प्रदान करण्यात आला.

### इतिहास प्रेरणा घेण्यासाठी असतो – श्रीमंत माने

इतिहास हा काहीतरी मिळवण्यासाठी किंवा गर्व बाळगण्यासाठी नसतो त्यातून प्रेरणा घ्यायची असते. एकेकाळात वऱ्हाड व अमरावती जिल्हा ऐश्वर्यसंपन्न होता. अमरावती शहरानं देशाला खूप काही दिलं आहे. पण आज येथील लोकांना त्याचा विसर पडला आहे. आताच्या राजकारणात खोट्या अभिमानाच्या मागे आपण आपली तत्व विसरून गेलो आहोत. यावर बोलण्याची गरज आहे. पत्रकारांनी त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, अशी प्रतिक्रिया यावेळी बोलताना राज्यस्तरिय पत्रकारिता पूरस्कार प्राप्त दै. लोकमतचे संपादक श्रीमंत माने यांनी व्यक्त केली.

### आधी विकल्या जातात, नंतर छापल्या जातात-बच्चू कडू

यावेळी बोलताना माजी मंत्री बच्चू कडू म्हणाले की, कोणताही राजकिय वारसा नसताना, मोठ्या पक्षाचा पाठिंबा न घेता माझ्यासारखा कार्यकर्ता वीस वर्ष आमदार म्हणून निवडून आला. चांगल्या पत्रकारितेचा त्यासाठी आपल्याला फायदा झाला. मात्र आजच्या काळात वातावरणही गढूळ झाले आहे आणि पत्रकारिताही बदलली आहे. लोकहितासाठी आम्ही जी कामे करतो, जे प्रश्न मांडतो त्यासंबंधीच्या बातम्या आज छापून येत नाही किंवा दाखविल्या जात नाही. असे म्हणतात की, पूर्वी वर्तमानपत्र आधी छापले जायचे आणि नंतर विकले जायचे आता उलट झाले आहे. आता असं म्हणतात की, वर्तमानपत्र आधी विकले जाते नंतर छापले जाते, अशी टीका बच्चू कडू यांनी केली.

### भाउसाहेबांच्या विचारावर कार्य!

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ म्हणाले की, स्व. दादासाहेब काळमेघ यांच्या नावाने जिल्हा मराठी पत्रकार संघाने सुरु केलेला हा पहिला जीवनगौरव पूरस्कार दिला जात आहे, याचा आपल्याला अत्यंत आनंद आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करण्यापूर्वी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी महाराष्ट्र केसरी नावाने एक नियतकालिक सुरु केले होते. लोकशिक्षण आणि विचारविनिमयाचे प्रभावी माध्यम म्हणून भाउसाहेबांनी त्याचा वापर केला होता. भाउसाहेबांच्या अमरावती जिल्ह्यात त्यांचे ते कार्य आज जिल्हा मराठी पत्रकार संघाकडून पूर्ण केले जात असल्याचे हेमंत काळमेघ म्हणाले.

# विविध मागण्यांसाठी जनता युवा संघटनेचे गिरीश चौधरी यांचे अन्नत्याग आंदोलन

## महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीपासून मासोदमध्ये उपोषण सुरू



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.1 )** – अंजनगाव बारी सर्कलच्या मोसाद येथील जानता युवा संघटनेचे संस्थापक व सामाजिक कार्यकर्ते गिरीश चौधरी यांच्या नेतृत्वात विविध मागण्यांसाठी गुरूवारी महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त (दि.30) मासोद येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. त्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधानांना पाठविले आहे. याबाबतची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष अंकुश मानकर व सचिव मयूर वानखडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रत्येक गावात व शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा लावणे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल चुकीचे वक्तव्य करणारे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना संसदेत माफी मागून राजीनामा द्यावा, शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, शेतकऱ्यांना एक लाख कर्ज देणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज, भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न देण्यात यावे, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका इत्यादी सर्व निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षणाशिवाय घेणे, रक्षाबंधनपर्यंत लाडकी बहिण योजना 3100 रुपये देणे, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, अपंग बांधव आणि ज्येष्ठांसाठी योजना एप्रिल 2025 पर्यंत आदींसह विविध मागण्यांसाठी गिरीश चौधरी यांनी गुरूवारीपासून तीन दिवसीय अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.

विविध मागण्यांबाबत जनता युवा संघटनेचे गिरीश चौधरी यांच्या अन्नत्याग आंदोलनाचे निवेदन पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र, फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, खा.बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, डॉ. पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांना सुध्दा देण्यात आले आहे. आंदोलनाचा दुसरा दिवस असुन राजुरा येथील नागरिक व महिलांनीही या अन्नत्याग आंदोलनात %साखळी उपोषणाद्वारे% सहभाग घेतला. यावेळी राहुल काकबाडे, पोलीस पाटील ,मनिष गवळी,निलेश इंगळे,अभिषेक उमक, भविनाश मसकाम, डॉ. मंगेश पाटील, नितीन राऊत, समर्थ बोरकर रेखा धर्मोळे ,राजाऊ राऊत, कैलास पुरी, सार्थक रोषके, चंद्रशेखर पतंगराय, तन्मय टेकाडे, प्रणय गंजीवाले, अभिषेक पंचिरे, प्रकाश महले, भावेश शेळके, योगेश माणकर, संतोष कर्णवार, प्रविण मुंजाळे, लक्ष्मण मुंजाळे, विक्की पतंगराय, आकाश बोडके इ.उपस्थित होते.